स्वमत-निर्णयः

(यष्टी १६ / २६५ ते २७४)

॥ श्रीज्ञानराजमाऊली समर्थ ॥

श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥१॥
पञ्चायतनमित्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।
दण्डवत्प्रणिपत्याथ वक्ष्ये स्वमतनिर्णयम् ॥२॥
शांकरज्ञानसंयुक्तं भगवद्भक्ति-अलंकृतम् ।
यद्वाक्यं तत्प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः ॥३॥
धर्मो ज्ञानं हरेर्भक्तिः पालनीयं त्रयं सदा ।
नीतिः कालानुरोधेनास्त्विति स्वमतनिर्णयः ॥४॥
सत्त्ववृद्धिर्भवेद्येन अन्यगुणद्वयघातिनी ।
स हि धर्मो न चान्यः स्यादितिस्वमतनिर्णयः॥५॥

१. श्रीमान् श्रीज्ञानेश्वरमहाराज हे गुरु, पार्वती आई, शंकर पिता, श्रीकृष्ण पति व राधिकादि गोपिका बहिणी हे माझे आराध्य-पंचायतन आहे.

२. त्यांना अंतःकरणांत स्थापन करून, पूजन करून व काठी जशी खाली पडते त्याप्रमाणे त्यांना नमस्कार करून स्वमतनिर्णय हा ग्रंथ मी सांगते.

३. सगुण भगवद्भक्तीने सुशोभित झालेले असे जे भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांचे जें वचन असेल तें प्रमाण आहे असें माझें निश्चित मत आहे.

४. स्वधर्म, अद्वैतज्ञान आणि सगुण भगवंताची भक्ति ह्या तीन गोष्टींचे सर्वदा पालन करावे. (कधीहि सोडू नये.) नीतीचें आचरण कालानुसार असावे, असें माझें मत आहे.

५. रज व तम या दोन गुणांचा नाश करून जेणें करून सत्त्वगुणाची वाढ होईल असे जें शास्त्रोक्त आचरण तोच धर्म होय. (रजोगुण तमोगुण वाढविणारे आचरण धर्म नव्हे) असें माझे मत आहे. ॥५॥

तीव्रतपस्विनां देहे ब्राह्मण्यं कर्मभिर्गुणैः ।
जन्मनैव तदन्येषामिति स्वमतनिर्णयः ॥६॥
स्वधर्मे परधर्मे वा यत् सत्त्वफलसाधकम् ।
तत् तदस्तु परं धर्म्यमिति स्वमतनिर्णयः ॥७॥
सौषुप्ता श्रुतिरस्पष्टा, स्पष्टा जाग्रच्छ्रुतिर्भवेत् ।
प्रामाण्यं तु द्वयोस्तुल्यमिति स्वमतनिर्णयः ॥८॥
पशौ दण्डः शिशौ मौनं शठे शाठ्यं ऋजौ रतिः ।
सभ्येषु सभ्यता नीतिरिति स्वमतनिर्णयः ॥९॥
मानसे वनितासक्तिर्बाह्योपस्थनिरोधनम्
एवं तर्हि विवाहः स्याद्वरं स्वमतनिर्णयः॥१०॥ (य१६.२६५)

६. शमदमादि जी ब्राह्मणाची लक्षणें सांगितलीं आहेत ती ज्यांचे ठिकाणीं अढळ असतील, अशा तीव्रतपःसंपन्न पुरुषाचे ब्राह्मण्य त्याच्या त्या गुणकर्मावरूनच मानावे व इतरांचे जन्मजातिवादानुसार मानावें असें माझें मत आहे.

७. स्वतःच्या धर्मांत किंवा दुसऱ्याच्या धर्मांत जे जे कांही सत्त्वगुणाची वाढ करणारे सांगितले असेल तेवढे तेवढे आचरण धर्म होय, असें माझें मत आहे.

८. वेद हे सुषुप्तींत असलेल्या पुरुषाच्या मुखांतून निघाणाऱ्या शब्दाप्रमाणे अस्पष्टार्थबोधक असून, भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलेली गीता ही जागृतींत बोलणाऱ्या पुरुषाच्या शब्दाप्रमाणे स्पष्टार्थबोध करणारी आहे. वेद व गीता ह्या दोघांचें प्रामाण्य समान (बरोबरीचे) आहे, असें माझें मत आहे.

९. मूर्खांना शासन करणें, लहान मुलाविषयीं मौन धारण करणें, शठाशीं शठाप्रमाणें वागणें, निर्मळ व सरळ अंतःकरण असलेल्याशी प्रेम करणे व सभ्य पुरुषांशीं सभ्यतेनें वागणें, हीच व्यावहारिक नीति आहे, असें माझें मत आहे.

१०. अंतःकरणातील विषयवासना नाहीशी न झाल्यामुळे अंतःकरणांत स्त्रीभोगाची वासना ठेवून बाहेर बळेंकरून ब्रह्मचर्य पाळण्यापेक्षां

विवाह करून गृहस्थाश्रमाचा स्वीकार करणें बरे, असें माझें मत आहे.

स्वस्त्रीसत्त्वेऽपि वैराग्यं तीव्रमत्यन्तमेव चेत् ।
संन्यासग्रहणं श्रेष्ठमिति स्वमतनिर्णयः ॥११॥
श्रोतव्यं श्रुतिशास्त्राभ्यां मन्तव्यं चोपपत्तिभिः ।
ध्यानाद्-अनुभवाज्ज्ञानमिति स्वमतनिर्णयः॥१२॥
समदृष्टिर्ब्रह्मबुद्ध्या विश्वदृष्ट्या तु वर्तनम् ।
वर्णाश्रमानुसारेण अस्त्विति स्वमतनिर्णयः॥१३॥
कर्मज्ञाने सदा देये उच्चैः, नीचैर्विपद् यदि ।
भक्तिः केनापि कस्मैश्चित् देया स्वमतनिर्णयः॥१४॥
दोषो महान् अनाचारो ह्यत्याचारस्तु मूर्खता ।
विचार-आचारयोगो हि युक्तः स्वमतनिर्णयः॥१५॥

११. स्वतःची स्त्री असून तीव्रतम विषयवैराग्य असल्यास संन्यास ग्रहण करणें उत्तम असें माझें मत आहे.

१२. श्रुति व शास्त्र यांची एकवाक्यता करून अध्यात्मज्ञान श्रवण करावे. श्रवण केलेल्या सिद्धान्ताचे श्रुतिशास्त्राला विरोध येणार नाहीं अशा युक्तीने चिन्तन करावे व ध्यान आणि अनुभव ह्यांच्या साह्याने अपरोक्ष आत्मसाक्षात्कार करून घ्यावा किंवा जीवब्रह्माचे ऐक्य अनुभवावे असे माझें मत आहे.

१३. ज्ञानी पुरुषांनी ब्रह्मबुद्धीने सर्वत्र समदृष्टि ठेवावी (म्हणजे अणुरेणुपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्वत्र एक सच्चिदानंद ब्रह्म भरले आहे, असे पाहावे) पण जगाशी वागतांना जगांत दिसून येणाऱ्या विषमतेकडे लक्ष राहतच असल्यामुळें आपल्या धर्मांत जसे आचरण करण्यास सांगितलें असेल तसेंच आचरण केलें पाहिजे, असें माझे मत आहे. ॥१३॥

१४. आपत्काळ नसतांना धर्मज्ञान व अध्यात्मज्ञान उच्च वर्णापासून नीच वर्णांनी संपादन करावे व आपत्कालीं नीचवर्णापासूनहि उच्च वर्णांनी ते संपादन करण्यास हरकत नाही. भक्ति मात्र कोणालाहि कोणापासूनहि ग्रहण करता येते; असें माझें मत आहे.

१५. शास्त्रनिषिद्ध वागणें हा महान् दोष आहे, शास्त्रविहित

आचारावर अत्यंत सदा भर देणे, हा अविचार होय व विचारानें सत्त्वगुणवर्धक जो आचार असेल तो आचरण करणें योग्य, असें माझें मत आहे.

श्रद्धयैव आचरेत् कर्म युक्त्या तत्त्वविवेचनम् ।
भक्तिज्ञाने प्रतीत्यैवेत्येवं स्वमतनिर्णयः ॥१६॥
अनादिमायया सुप्तं बोधयत्यम्बिका श्रुतिः ।
तत्तात्पर्यं चितौ, सृष्टौ नेति, स्वमतनिर्णयः॥१७॥
पञ्चीकरणवाक्याच्च त्रिवृत्करणवाक्यतः।
मिथ्यैव सृष्टिमीमांसा इत्येवं स्वमतनिर्णयः ॥१८॥
मनसस्तीव्रता विश्वं मार्दवं तस्य कल्पना ।
स्वप्नो मध्यमता चैव इत्येवं स्वमतनिर्णयः ॥१९॥
प्रतिभासो जगत् ह्येतद् ब्रह्मैकं पारमार्थिकम् ।
सत्त्वं तृतीयं नैवास्त इति स्वमतनिर्णयः ॥२०॥

१६. अत्यंत श्रद्धा पूर्वक कर्माचे आचरण करावे. (म्हणजे कर्मानुष्ठानांत श्रद्धेला प्राधान्य आहे)

आत्मविवेक युक्तीनें करावा. (म्हणजे तेथे युक्तीला प्राधान्य आहे) व ज्ञान व भक्ति अनुभवप्रधान असते असे माझें मत आहे.

१७. अनादि कालापासून आपल्या स्वरूपाला विसरलेल्या जीवाला त्याच्या स्वरूपाचे ज्ञान करून देणारी श्रुति मुमुक्षूला मातेप्रमाणे आहे; म्हणून श्रुतीच्या सर्व निरूपणाचें तात्पर्य जीवाला आत्मस्वरूपाचे ज्ञान करून देण्यांत आहे. सृष्टीचे सत्यत्व प्रतिपादन करण्यांत नाहीं; असें माझें मत आहे.

१८. कोठे श्रुतींत पंचभूतांच्या मिश्रणापासून सृष्टि उत्पन्न झाली, असें सांगितले आहे, तर कोठे तीन भूतांच्या मिश्रणापासून तिची उत्पत्ति झाली असे सांगितलें आहे. यावरून सृष्टीच्या उत्पत्तीचा संपूर्ण विचार समूळ खोटा आहे, असें वेदावरून सिद्ध होते, असें माझें मत आहे.

१९. मनाच्या कल्पनेचा तीव्र वेग म्हणजे जागृत जगत् स्थिति, मध्य वेग म्हणजे स्वाप्निक जगत् स्थिति व मृदु कल्पना म्हणजे

काल्पनिक जगत् स्थिति असें माझें मत आहे. (वेग=मनोसंवेग)

२०. जगत् हे कल्पनेचा भास असून ब्रह्म हीच सत्यवस्तु आहे, काल्पनिक व सत्य अशा ह्या दोन अस्तित्वावांचून जगांत तिसरें अस्तित्व मुळींच नाही असे माझें मत आहे.

भजनीयाः परा नार्या जगदम्बधिया सदा ।
न याचेत् रतिस्तास्तु मनाक् स्वमतनिर्णयः॥२१॥
धार्मिकासु अपि नारीषु जननीकन्यकादिषु ।
विश्वासो नैव कर्तव्य इति स्वमतनिर्णयः ॥२२॥
दैवायत्तौ अर्थकामौ सेव्यौ सदनचारिभिः ।
धर्ममोक्षौ प्रयत्नेन इत्येवं स्वमतनिर्णयः ॥२३॥
चमत्कारा न कर्तव्याः स्थाने कार्यं विना क्वचित् ।
भगवत्कष्टदा व्यर्था इति स्वमतनिर्णयः ॥२४॥
भजेत्सांख्यं विवेकार्थं योगं वृत्तिनिरोधने ।
वेदान्तं परमार्थार्थमिति स्वमतनिर्णयः ॥२५॥

२१. सर्व स्त्रियांचे ठिकाणी पार्वतीबुद्धि करून पूज्य भावना ठेवावी, पण त्यांचे ठिकाणीं यत्किंचित् देखील कामवासना ठेवूं नये, असें माझें मत आहे.

२२. आई, बहीण, मुलगी किंवा अत्यंत धार्मिक स्त्री असली तरी कोणाहि स्त्रीवर विश्वास ठेवूं नये असें माझें मत आहे.

२३. गृहस्थाश्रमी पुरुषांनी अर्थ व काम हे दोन पुरुषार्थ दैवानुसार भोगावे व धर्म व मोक्ष या दोन पुरुषार्थाकरिता मात्र प्रयत्न करावा, असे माझें मत आहे.

२४. अत्यंत आवश्यकतेवांचून विनाकारण कधींहि चमत्कार दाखवूं नये; कारण भगवंताला कष्ट दिल्यावांचून चमत्कार होत नसल्यामुळे उठल्या सुटल्या चमत्कार करणें व्यर्थ आहे, असें माझें मत आहे.

२५. आत्मा व अनात्मा यांचा निवाडा करण्याकरितां सांख्य शास्त्राचा विचार करावा.

वृत्तीचा निरोध करण्याकरितां योग शास्त्राचा उपयोग करावा व

जीवब्रह्मैक्य साधण्याकरितां वेदान्त शास्त्राचा उपयोग करावा, असें माझें मत आहे.

स्वामिसेवकसंबंधद्योतनाय ईशजीवयोः ।
माध्वशास्त्रं प्रयोक्तव्यमिति स्वमतनिर्णयः ॥२६॥
पाञ्चरात्रात् पाशुपतात् पूजा ग्राह्या हरीशयोः ।
ज्ञानं शांकरवेदान्तादिति स्वमतनिर्णयः ॥२७॥
अंशांशित्वं बोधयितुं परमेश्वरजीवयोः ।
विशिष्टाद्वैतशास्त्रं स्यादिति स्वमतनिर्णयः ॥२८॥
शुद्धं शांकरमद्वैतं निबोधायैक्यमात्मनोः ।
भक्तिस्तत्रापि न त्याज्या इत्येवं स्वमतनिर्णयः॥२९॥
यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिर्प्रत्यगात्मनि ।
वेदान्तप्रक्रिया सा सैवेति स्वमतनिर्णयः ॥३०॥

२६. ईश्वर स्वामी, जीव सेवक अशा स्वामीसेवक संबंधानें भगवंताची भक्ति करण्याकरितां माध्वशास्त्र उपयोगी आहे, असें माझें मत आहे.

२७. परमेश्वराची भक्ति करतांना शंकराची भक्ति करणाऱ्यांनी शंकराच्या पूजेचा प्रकार पाशुपत मतांतून घेण्याजोगा आहे व विष्णूच्या पूजेचा प्रकार पंचरात्र आगमातून घेण्यायोग्य आहे असें माझें मत आहे.

२८. जीव व परमेश्वर ह्यांचा अंश-अशीभाव दाखविण्यापुरतें विशिष्टाद्वैत मत ग्राह्य आहे, असें माझें मत आहे.

२९. जीव परमेश्वर यांचे अत्यंत ऐक्य आहे, हे दाखविण्याकरितां शंकराचार्याचे अद्वैतमत अत्यंत उपयुक्त आहे; पण त्या अद्वैतानंतरहि सगुण परमेश्वराची भक्ति सोडूं नये, असें माझें मत आहे.

३०. ज्याला ज्याला ज्या ज्या प्रक्रियेने जीवब्रह्मैक्यज्ञान होईल, ती ती आत्मज्ञानप्रक्रिया होय, असें माझें मत आहे.

सच्चरित्रं समर्थानां ग्राह्यं नासत् कदाचन ।
अश्रद्धाऽपि न कर्तव्या तथा स्वमतनिर्णयः ॥३१॥
मुख्या वैकल्पिका प्रोक्ता धर्माः सम्यक् श्रुतौ स्मृतौ ।

आद्याः सदा विपदि-अन्य इति स्वमतनिर्णयः ॥३२॥
श्रोत्रियो ब्रह्मनिष्ठश्च महाभागवतो गुरुः ।
श्रुतिस्मृतिपुराणानि शास्त्रं स्वमतनिर्णयः ॥३३॥
दृश्यं नास्तीति बोधेन मनः संकल्पवर्जनात् ।
ज्ञात्वाऽद्वैतं भजेत्कृष्णमिति स्वमतनिर्णयः॥३४॥
चिद्विवर्तमिदं विश्वं परिणामो भ्रमस्य हि ।
ज्ञानं तन्नाशकं कर्म नेति स्वमतनिर्णयः ॥३५॥

३१. सत्पुरुषांचे शास्त्रानुसार असलेले उत्तमाचरण ग्रहण करण्यास योग्य असून प्रारब्धानुसार होणाऱ्या असदाचरणाचें अनुकरण करू नये व तेवढ्यावरून त्यांच्यावर अश्रद्धाहि करू नये, असें माझें मत आहे.

३२. श्रुति व स्मृतीमध्ये मुख्य आणि वैकल्पिक असे दोन प्रकारचे धर्म सांगितले असून मुख्य धर्म सर्वदा अनुष्ठेय आहे आणि आपत्काली वैकल्पिक धर्माचें अनुष्ठान करावें, असें माझें मत आहे.

३३. विद्वान्, आत्मानुभवी व भगवद्भक्त अशाच पुरुषाला गुरु म्हणावे आणि श्रुति, स्मृति व पुराणें हीच विचार करण्याजोगीं शास्त्रें आहेत, असें माझें मत आहे.

३४. दृश्य जगत् नाहीं, असें तत्त्वविचारानें जाणून घेऊन जगताविषयी संकल्प-विकल्प करणें सोडून द्यावें आणि अद्वैतस्थिति प्राप्त झाल्यावर देखील श्रीकृष्णाचें भजन करावें, असें माझें मत आहे.

३५. जगत् हे अज्ञानरूपी भ्रमाचें परिणामरूप कार्य असून परब्रह्मावर भासणारे ब्रह्माचें विवर्त कार्य आहे. त्या जगाचा नाश ब्रह्मज्ञानानेंच होऊ शकतो, कर्मानें होत नाहीं असें माझें मत आहे.

पुण्याच्छुद्धिः उपास्त्यास्तु स्थैर्यं ज्ञानाद्विमुक्तता ।
प्रारब्धाभिभवो भक्त्यैवेति स्वमतनिर्णयः ॥३६॥
कालो दैवं परेशेच्छा भूतशोकापमार्जने ।
भाविदुःखं प्रयत्नेन हेयं स्वमतनिर्णयः ॥३७॥
विवर्तो द्विविधः प्रोक्तो अध्यस्तानध्यस्तभेदतः ।
भवोऽध्यस्तो ह्यनध्यस्तः कृष्णः स्वमतनिर्णयः ॥३८॥

चित्तमेव हि संसारस्तन्नाशो मुक्तिरात्मनः ।
दृष्टसौख्यप्रदा भक्तिरिति स्वमतनिर्णयः ॥३९॥
समाधौ व्यतिरेकेण ब्रह्म ज्ञानेन गोचरम् ।
अन्वये तत्पुनर्भक्त्यैवेति स्वमतनिर्णयः ॥४०॥

३६. निष्काम पुण्यकर्मानें चित्तशुद्धि होऊन, उपासनेनें चित्त स्थिर होते. ज्ञानानें पुरुष सर्व दुःखापासून मुक्त होऊन ज्ञानानंतरच्या सगुण भक्तीनें प्रारब्धाचा भासहि भासत नाही, असें माझें मत आहे.

३७. कालाचें महत्त्व सांगणे, दैववादाची महती गाणें किंवा भगवंताची इच्छा म्हणणें, हे सर्व जीवाला (पूर्वी) झालेल्या शोकाच्या निवारणार्थ आहे. पुढे येणारें दुःख मात्र नाहीसें करण्याकरितां प्रयत्न करावा, असें माझें मत आहे.

३८. विवर्त दोन प्रकारचा आहे. एकाला अध्यस्त व दुसऱ्याला अनध्यस्त म्हणतात. मायेच्या त्रिगुणापासून उत्पन्न झालेला नामरूपात्मक सगुण प्रपंच अध्यस्तविवर्त असून श्रीकृष्ण परमात्मा अनध्यस्तविवर्त होय, असे माझें मत आहे.

(भ्रमाने भासणाऱ्या सगुणाला अध्यस्तविवर्त म्हणतात व भ्रमावांचून भासणाऱ्या सगुणाला अनध्यस्तविवर्त म्हणतात)

३९. आपले मन म्हणजे संसार असून मनाचा नाश म्हणजे मुक्ति होय, आणि दृष्टपरमानंद देणारी भक्ति आहे, असें माझें मत आहे.

४०. व्यतिरेक-समाधिमध्यें ब्रह्म ज्ञानगम्य असून अन्वयांत तेच पुनः भक्तीनें प्राप्त होते असें माझें मत आहे.

विषयाशाविनाशाय भजेच्छैलसुतापतिम् ।
रसास्वादविनाशाय कृष्णं स्वमतनिर्णयः॥ ४१॥
कृष्णः सेव्यः श्रियाश्लिष्टो राधया गोपिकायुतः।
उमया गंगया शंभुरिति स्वमतनिर्णयः ॥४२॥
प्रतिबिम्बोहि जीवोऽयं बिम्बभूतः परेश्वरः।
दृष्टिसृष्टिविवादेऽपि भक्तिः स्वमतनिर्णयः ॥४३॥
श्रुत्या युक्त्या स्वानुभूत्या मंडनीयं स्वकं मतम् ।

अन्यत् केवलतर्केण घात्यं स्वमतनिर्णयः ॥४४॥
भोगकाले पराधीनः क्रियाकाले स्वतंत्रकः ।
जीवो हीशोऽनुमन्ता स्यादिति स्वमतनिर्णयः॥४५॥

४१. वैराग्य दृढ होण्याकरितां पार्वतीपति जो भगवान् शंकर त्याची भक्ति करावी व रसास्वादरूपी (भोक्तृत्व) विघ्न नाहीसे करण्याकरितां श्रीकृष्णाचें भजन करावें, असें माझें मत आहे.

४२. श्रीकृष्णाची भक्ति करावयाची ती लक्ष्मीसह, रुक्मिणीसह, राधेसह, किंवा गोपिकेसह असलेल्या श्रीकृष्णाची करावी. त्याचप्रमाणें श्रीशंकराची भक्ति करावयाची ती पार्वती किंवा गंगा यांसह करावीं, असें माझें मत आहे.

४३. जीव प्रतिबिंम्बरूप असून परमेश्वर बिंम्बरूप आहे. आणि ह्या संबंधानुसार दृष्टिसृष्टिवादियांनाहि भक्ति करतां येते असें माझें मत आहे.

४४. आपले स्वतःचें मत सिद्ध करावयाचें असल्यास ते श्रुति, युक्ति, अनुभव ह्या तीन प्रमाणांच्या सहाय्यानें सिद्ध करीत जावे. आणि दुसऱ्याचें मत केवळ तर्कानें खंडण करावें असें माझे मत आहे.

४५. जीव हा कर्म करतेवेळी स्वतंत्र असून भोग भोगते वेळी मात्र परतंत्र असतो. आणि ईश्वर हा तटस्थ राहून अनुमन्ता असतो असें माझें मत आहे.

सिद्धैरपि न कर्तव्यो धर्मत्यागः कथञ्चन ।
दीनलोकानुग्रहार्थमिति स्वमतनिर्णयः ॥४६॥
धारावाही रसो भक्तिरीशे तत्पदगोचरे ।
त्वंपदज्ञो परो भक्त इति स्वमतनिर्णयः ॥४७॥
दशापराधसंयुक्त देवतानामधारकम् ।
उत्सृजेत्तं श्ववद् दूरमिति स्वमतनिर्णयः ॥४८॥
गुरुर्माता पिता भर्ताऽन्यो वा मान्यः सुमार्गदः ।
त्याज्यो विपर्यये कोऽपीत्येवं स्वमतनिर्णयः॥४९॥
चितौ देहे च यो रागी, नासौ मुक्तो न भोगभाक् ।

मूढः केवलदुःखात्मा चेति स्वमतनिर्णयः ॥५०॥

४६. सिद्धपुरुषांनी देखील जाणूनबुजून धर्मत्याग न करता पामर लोकांना मार्ग दाखविण्याकरितां धर्मानुसार आचरण ठेवावे असे माझे मत आहे.

४७. वेदान्तात तत् पदाने संबोधिला जाणारा जो परमात्मा त्या परमेश्वराचे ठिकाणी 'अखंड प्रेमवृत्तीचा प्रवाह' वाहणे याला भक्ति म्हणतात आणि 'शुद्ध त्वंपद जाणणारा' जो जीव त्याला भक्त म्हणतात.

४८. शास्त्रांतून नामस्मरणाचे जे दहा अपराध सांगितले आहेत ते अपराध करीत राहून नामस्मरण करणारा श्वानाप्रमाणे दूर झिट्कारावा असें असें माझें मत आहे.

४९. गुरु, आई, बाप, पति अथवा कोणीहि आपल्याला हितकारक परमार्थ मार्गास लावणारे असल्यासच त्यांना पूज्य समजावे. नाहीतर त्यांचा त्यागच करावा, असें माझें मत आहे.

५०. देहाचे ठिकाणीं प्रेम ठेवून ब्रह्मप्राप्तीचे ठिकाणी प्रेम ठेवणारा पुरुष संसारी नव्हे व मुक्तहि नव्हे. तो मूढ केवळ दुःखाचाच भागीदार होतो असें माझें मत आहे.

मुक्तो भक्तो गृहस्थश्चेद् यथालोकहितं चरेत् ।
विमुक्तस्त्वपराधीन इति स्वमतनिर्णयः ॥५१॥
सूर्ये विनायके शक्तौ शिवे विष्णावभिन्नधीः ।
सेवेत शिवगोविन्दौ नित्यं स्वमतनिर्णयः ॥५२॥
कान्ताकाञ्चनसंसक्तं ब्रह्माहमितिवादिनम् ।
चाण्डालवत् त्यजेद् दूरमिति स्वमतनिर्णयः ॥५३॥
स्वाभाविकी जनश्रद्धा त्रिविधा गुणभेदतः ।
विदुषस्तज्जयादेका चित्तौ स्वमनिर्णयः ॥५४॥
शास्त्रसंस्काररहितः श्रद्धावांल्लभते फलम् ।
त्यजेज्ज्ञात्वाल्पशास्त्रं यः पापः स्वमतनिर्णयः॥५५॥

५१. मुक्त व भक्त असून गृहस्थाश्रमी असल्यास त्यांनी, अनुसरणाऱ्या लोकांचे कल्याण होईल किंवा त्याच्या वर्तनापासून लोकांना

कल्याणाचा मार्ग अनुसरतां येईल असें वागावें, केवल मुक्त मात्र कशाच्याहि स्वाधीन नसतो, असें माझें मत आहे.

५२. सूर्य, गणपति, देवी, शंकर, विष्णु यांचे ठिकाणी अभेद बुद्धि ठेवून शिव विष्णूचें नित्य भजन करावें, असें माझें मत आहे.

५३. स्त्री आणि धन ह्यांचे ठिकाणीं आसक्त असून तोंडाने 'मी ब्रह्म आहे' अशी बडबड करणाऱ्या पुरुषाला चांडाळाप्रमाणे दूर वाळीत टाकावें, असें माझें मत आहे.

५४. सत्त्व, रज, तम ह्या तीन गुणानुसार लोकांत तीन प्रकारची स्वाभाविक श्रद्धा दिसून येते, पण ज्ञानी पुरुष वरील स्वाभाविक श्रद्धेला जिंकून एका अद्वैत परब्रह्माला ग्रहण करणारी शास्त्रीय श्रद्धाच ठेवतो असें माझें मत आहे.

५५. ज्याला शास्त्राचा मुळीच गंध नाही पण श्रद्धावान् आहे असा पुरुष तरून जातो, पण शास्त्र पाहून शास्त्रांतील एक अंश ग्रहण करून दुसरा अंश सोडून देणारा पुरुष मात्र पातकी होय, असें माझें मत आहे.

सम्बन्धोऽन्यः प्रयोक्तव्योऽवतारेषु यथारुचि ।
पतिभावस्तु गोविन्दे इति स्वमतनिर्णयः ॥५६॥
भक्तौ हेया लोकलज्जा न भिक्षायां कदाचन ।
विरक्तस्त्वपराधीन इति स्वमतनिर्णयः ॥५७॥
मानः सन्निकटे हेयो न मूर्खनिकटे कदा
कुवैद्यं तु जयेद्वादे इति स्वमतनिर्णयः ॥५८॥
यतिश्चेन्निर्मलश्चित्ते जननिन्दान्वितो बहिः ।
ब्रह्मदृष्टिश्चरेन्मौनी चेति स्वमतनिर्णयः ॥५९॥
स्वस्याज्ञानविनाशाय न परोऽजोऽपि शक्तिमान् ।
केवलः स्वप्रयत्नो हीत्येवं स्वमनिर्णयः ॥६०॥

५५. पतिसंबंध सोडून कोणताहि प्रेमसंबंध कोणत्याहि अवताराचे ठिकाणीं करतां येतो. पतिप्रेम मात्र श्रीकृष्णाचेच ठिकाणी ठेवता येतो, असें माझें मत आहे.

५६. विरक्त पुरुषाला निर्बंध नाहीं पण इतरांनी मात्र भिक्षा मागतांना लोकलज्जा सोडूं नये, पण भक्ति करतांना लोकलज्जा सोडावी असें माझें मत आहे.

५७. सज्ञानापासून मान घेऊं नये पण मूर्खापासून तो मान न घेतां राहू नये. तसेच, वैद्यशास्त्र न जाणणाऱ्या अशा कुवैद्याला वादांत जिंकावे असें माझें मत आहे.

५८. संन्यासी असल्यास त्यानें चित्तांत अत्यंत निर्मल राहून बाहेर लोक निंदा करतील असें वागावें आणि परब्रह्माचे ठिकाणी लक्ष्य ठेवून मौन धारण करून राहावें असें माझें मत आहे.

६०. विचाराने आपणच आपल्या अज्ञानाचा नाश करण्याचा स्वतः प्रयत्न केल्यावांचून दुसरा कोणीहि, ईश्वर देखील आपल्या अज्ञानाचा नाश करण्यास समर्थ नाही, असें माझें मत आहे.

आचार्यकरुणा ज्ञेया ह्यन्तरायविनाशिनी ।
विचारस्तु स्वबुद्ध्यैव कार्यः स्वमतनिर्णयः ॥६१॥
यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान् बुधः ।
भक्त्यभावे वृथा गीतमिति स्वमतनिर्णयः ॥६२॥
ईशे संबंधवृद्ध्यर्थं नटवेषो न दोषभाक् ।
विना कृष्णं त्यजेत्काव्यमिति स्वमतनिर्णयः ॥६३॥
सिद्धं वेदपुराणेषु कलौ गंगा न यास्यति ।
अतः सा सर्वतीर्थेभ्योऽधिका सेव्येति निर्णयः ॥६४॥
कार्या मूर्तावीशदृष्टिर्मूर्तिदृष्टिर्न चेश्वरे ।
एतच्चोपासनातत्त्वमिति स्वमतनिर्णयः ॥६५॥

६१. आत्मविचार जो करावयाचा तोहि आपल्या बुद्धीनेंच केला पाहिजे. सद्गुरूची कृपा बुद्धींतील विघ्नें दूर करणारी आहे, असें माझें मत आहे.

६२. अहिंसादिक 'यम' धर्मांचें सर्वदा सेवन करावे. तसें नियमांचे सर्वदा म्हणजे आपत्काली सेवन करूं नये.

भक्तिप्रेम नसतां गायनादिक प्रकार व्यर्थ होत, असें माझें मत

आहे.

६३. परमेश्वराशी आपण जो भक्तीचा संबंध लावला असेल तो दृढ करण्याकरितां त्या संबंधानुसार नटवेष (सोंग) घेणें दोषावह नाहीं.

आणि ज्या काव्यांत भगवंताचे गुण गायिले नाहींत असें काव्यहि त्याज्य होय, असें माझें मत आहे.

६४. कलियुगांतहि गंगेचे माहात्म्य नाहिसें होत नाहीं हें वेदपुराणादिवरून सिद्ध असल्यामुळे सर्व तीर्थांत गंगेला श्रेष्ठच समजावें, असें माझें मत आहे.

६५. मूर्तीच्या ठिकाणीं ब्रह्मभावना करावी पण ब्रह्माचे ठिकाणी मूर्त्तिदृष्टि करूं नये हे उपासनेचे तत्त्व आहे, असें माझें मत आहे.

कृष्णदेहः परं ब्रह्म तत्र दृष्टिविधिर्न हि ।
संबंधदार्ढ्यं तद्भक्तौ कार्यं स्वमतनिर्णयः ॥६६॥
श्रुतिः समन्वयाध्यायात् द्वितीयान्मननं भवेत् ।
तृतीयात्साधनं साध्यं अन्त्यात्स्वमतनिर्णयः ॥६७॥(शां.ब्र.सूत्रभाष्य)
श्रीकृष्णौ द्वावुपास्तौ स्तो विद्यायामैक्यता तयोः ।
गीता प्रामाण्यतः साक्षादिति स्वमतनिर्णयः ॥६८॥
श्लोकात् तदर्धात् तत्पादाद् ब्रह्मज्ञानं भवेद्यदि ।
तस्य प्रयोजनं क्षीणमिति स्वमतनिर्णयः ॥६९॥
संसक्तिर्द्विविधा प्रोक्ता वंध्या वंद्येति भेदतः ।
आद्या बद्धेषु बुद्धेषु परा स्वमतनिर्णयः ॥७०॥

६६. श्रीकृष्णाचा देह पूर्ण ब्रह्मस्वरूप असल्यामुळे तेथें ब्रह्मभावना करण्याची आवश्यकता नाहीं, पण श्रीकृष्णाची भक्ति करीत असतांना भक्ति अनुसार संबंध मात्र दृढ करावा असें माझें मत आहे.

६७. (शांकरभाष्य) ब्रह्मसूत्रांतील समन्वयाच्या प्रथमाध्यायांत लिहिलेल्या एकवाक्यतेनुसार वेदान्ताचें श्रवण करावें. दुसऱ्या अध्यायानुसार मनन करावें. साधनांचा विचार तिसऱ्या अध्यायांतून घेऊन शेवटीं चवथ्या अध्यायांतून मोक्षरूपीं साध्याचा विचार करावा, असें माझें मत आहे.

६८. गीतेच्या प्रामाण्यावरून उपासनेंत दोन श्रीकृष्णाचा निर्देश दिसतो व (पण) ब्रह्मज्ञानदृष्टीनें दोघांचे ऐक्य आहे, असें माझें मत आहे.

६९. श्लोकानें, श्लोकार्धाने वा एका चरणाने देखील ब्रह्मज्ञान झाल्यास त्याला (इतर) कोण्याहि साधनाचें प्रयोजन उरत नाहीं, असें माझें मत आहे.

७०. वंध्या व वंद्या अशी दोन प्रकारची संसक्ति असून वंध्या संसक्ति अज्ञान्याचे ठिकाणी असते व वंद्या संसक्ति ज्ञान्याच्या ठिकाणी राहत असते असें माझें मत आहे.

ईशेन निर्मिता वेदा वस्तुतो गुरुनिर्मिताः ।
स्वसत्त्वेनापरोक्षात् त इति स्वमतनिर्णयः ॥७१॥
गुरुशास्त्रेशदेहानां कल्पितत्त्वे ऽप्यहेयता ।
सात्त्विकत्वाद् अबाध्यत्वाच्चेति स्वमनिर्णयः ॥७२॥
कृष्णसेवा सदा कार्या मानसी सा परा मता ।
तदसिद्धौ भजेन्मूर्तिमिति स्वमतनिर्णयः ॥७३॥
विजातीयदृशा भूयात् प्रतीकेषु ह्युपासना ।
सजातीयदृशा मूर्तौ भक्तिः स्वमतनिर्णयः ॥७४॥
अलौकिकविवक्षायामसन्नायाति मानसे ।
अतः कल्पितशब्दार्थो हरिः स्वमतनिर्णयः ॥७५॥

७१. वेद हे ईश्वराने निर्माण केले असले तरी वस्तुतः वेद हे श्रीगुरूने निर्माण केले आहेत; कारण गुरूपदेशाने आपले पारमार्थिक अस्तित्व कळून 'मी ब्रह्म आहे' अशी ज्ञानवृत्ति उत्पन्न झाली असतां ते वेद अपरोक्ष होतात असें माझें मत आहे.

७२. श्रीगुरु, शास्त्र व देव ह्यांचे देह किंवा विग्रह कल्पित असले तरी तें अनादरणीय नाहीत (कारण ते विद्येने कल्पित आहेत अविद्येने नाहीत) उलट ते देह किंवा विग्रह शुद्धसात्त्विक असून ब्रह्मज्ञानानेहि निवृत्त होत नाहीत म्हणून आदरणीय आहेत असें माझें मत आहे.

७३. भगवान् श्रीकृष्णाची सर्वदा सेवा करावी व त्यांत मानसिक सेवा श्रेष्ठ आहे. पण मानसिक सेवा शक्य नसल्यास श्रीकृष्णमूर्तीची सेवा

करावी असें माझें मत आहे.

७४. प्रतीकाच्या ठिकाणी केलेली सेवा, ते प्रतीक बह्मस्वरूपाहून निराळे असल्यामुळें उपासना होते आणि श्रीकृष्णादि मूर्तीच्या ठिकाणी केलेली सेवा श्रीकृष्णादि ब्रह्मस्वरूपच असल्यामुळे ब्रह्मसजातीय म्हणून भक्ति होते; असें माझें मत आहे. (प्रतीक= अग्नीच्या ठिकाणी ईश्वरभावना इत्यादि)

७५. अत्यंत खोटा पदार्थ (ज्याचे मुळीच अस्तित्व नाही) मनात येऊ शकत नाही म्हणून लौकिकातील कोणत्याहि वस्तूच्या उच्चारलेल्या शब्दाचा 'तो पदार्थ आहे असे मनात धरले नसल्यास' (कोणत्याहि कल्पित पदार्थाचा) अर्थ भगवान हरि होतो, असे माझे मत आहे.

यत्तात्पर्यं न रागादौ हृद्गतज्ञापकं च यत् ।
तद्वाक्यं भयदं न स्यादिति स्वमतनिर्णयः ॥७६॥
गुरुश्च गुरुवाक्यं च स्वसत्त्वोपहितं यतः ।
श्रद्धयैव ततः सिद्धिरिति स्वमतनिर्णयः ॥७७॥
एकादशी सोमवारः शिवरात्रिर्व्रतत्रयम् ।
मोहेनापि न हातव्यमिति स्वमतनिर्णयः ॥७८॥
अलंदी हिमवान् काशी प्रयागो व्रजमण्डलम् ।
पंढरी चेति तीर्थानां षट्कमिष्टं स्वनिर्णयः॥७९॥
तत्त्वे ज्ञातेऽथवाऽज्ञाते न कदापीन्द्रियैः सह ।
बुद्धिमान् कुतुकं कुर्यादिति स्वमतनिर्णयः ॥८०॥

७६. उच्चारिलेले वाक्य, उच्चारणाऱ्याने विषयसुखाचे ध्येय ठेवून उच्चारिले नसल्यास व त्या वाक्यांतून उच्चारणाऱ्याच्या अंतःकरणांतील भाव स्पष्टपणें समजण्याजोगा असल्यास, ते वाक्य अहितकारक आहे असे कधी समजूं नये. त्या वाक्यावर विश्वास ठेवला असता धोका नाही असें माझें मत आहे.

७७. श्रीगुरु व श्रीगुरूचे वचन हे दोन्ही आपल्याच अस्तित्वावर भासत असल्यामुळे श्रद्धेनें सिद्धि होते म्हणजे 'जशी श्रद्धा तशी कार्यसिद्धि' होते असें माझें मत आहे.

७८. एकादशी, सोमवार, शिवरात्री ही तीन व्रतें केव्हांहि (मोहाने) अज्ञातपणे देखील भंगू देऊ नये, असें माझें मत आहे.

७९. आळंदी, हिमालय (केदारादिक), काशी, प्रयाग, वृंदावन आणि आणि पंढरी ही सहा तीर्थे सर्व तीर्थात मला प्रिय आहेत.

८०. आत्मज्ञान झाले असो किंवा नसो शहाण्या पुरुषाने इंद्रियांशी लाडवण्याची इच्छा धरूं नये असे माझे मत आहे.

कामिन्याः पुनरुद्वाहाद् वेश्याचारो वरो मतः ।
भविष्ये यादवेशोक्तेरिति स्वमतनिर्णयः ॥८१॥
वक्त्रमाच्छादयेत् पाके त्यागे च मलमूत्रयोः ।
ध्याने ऽशौचम् असत्कुर्यादिति स्वमतनिर्णयः ॥८२॥
श्रुतिस्मृतिपुराणानां स्वानुभूत्या समन्वयः ।
बाह्यानां विप्रलिप्सात इति स्वमतनिर्णयः ॥८३॥
गुरुमंत्रं न्यसेद् वायौ जिव्हायां शैववैष्णवौ ।
सर्वत्र गुरुमंत्रं स्याद् वेति स्वमतनिर्णयः ॥८४॥
विष्णुं सव्ये हृदि ध्यायेद् वामे हृदि महेश्वरम् ।
सहस्रारे गुरुं ध्यायेदिति स्वमतनिर्णयः ॥८५॥

८१. भविष्यपुराणांत श्रीकृष्णाचे वचन असल्यामुळे, स्त्रियांनी पुनः विवाह करण्यापेक्षां आत्मसंयमपूर्वक वागणे, अत्यंत हितावह आहे असें माझें मत आहे. पुनर्विवाह वेश्याधर्मापेक्षाहि निकृष्ट आहे, असा भावार्थ .

८२. स्वयंपाक करतांना व मलमूत्रांचा विसर्ग करतांना वस्त्राने तोंड झांकावे आणि ध्यानामध्ये अशुचि कल्पना उठल्यास त्यांचा त्याग करावा किंवा खोट्या म्हणून सोडून द्याव्या, असें माझें मत आहे.

८३. श्रुतिस्मृतिपुराणे यांची आत्मानुभवास धरून एकवाक्यता करावी व अवैदिक मतांची एकवाक्यता लबाडीने करावी असें माझें मत आहे.

८४. प्राणाचे ठिकाणी गुरुमंत्र ठेवून, जिव्हेच्या ठिकाणी शिवविष्णूचे नाम ठेवावे किंवा सर्वत्र श्रीगुरुमंत्रच स्मरावा (चिंतावा) असें माझें मत आहे.

८५. हृदयाचे ठिकाणीं उजव्या बाजूला विष्णूचे व डाव्या बाजूला शिवाचें ध्यान करावे व सहस्त्रदलाचे ठिकाणी श्रीगुरूचें ध्यान करावें, असें माझें मत आहे.

अन्तःकुम्भकयोगेन समाधौ निक्षिपेन्मनः ।
मृत्युं बहिःकुम्भकेन जयेत् स्वमतनिर्णयः ॥८६॥
प्रह्लाद-शबरी-गोपी-मीरादेः पालनाद्धरेः ।
भक्तार्थं जन्म, जात्यर्थं नेति स्वमतनिर्णयः ॥८७॥
कृतावतारे गोविन्दे मुख्यं प्रेमप्रपालनम् ।
स्यादानुषंगिको धर्मः सेव्यः स्वमतनिर्णयः ॥८८॥
शुद्धनिष्कामभक्तेस्तु न फलं हरिदर्शनम् ।
फलं हरिमयं चित्तमिति स्वमतिनर्णयः ॥८९॥
गोपीकृष्णौ उमेशानौ पादुके च जगद्गुरोः ।
सदा संपूजयेत् धीमानिति स्वमतनिर्णयः ॥९०॥

८६. अंतःकुंभकाच्या साहाय्याने मन समाधीत न्यावे व बहिःकुंभकाच्या साहाय्याने मृत्यूला जिंकावे असें माझें मत आहे.

८७. भगवंतांनी दैत्यकुळांत उत्पन्न झालेल्या प्रल्हादाचे, चांडाळ कुळात उत्पन्न झालेल्या शबरीचे, वैश्य कुळात उत्पन्न झालेल्या गोपींचे व क्षत्रिय कुळात उत्पन्न झालेल्या मीराबाईचे रक्षण केले, ह्यावरून एखाद्या जातीकरिता भगवंताचा अवतार होतो असे नसून भक्ताकरिता भगवान् अवतरतात असें माझें मत आहे.

८८. भगवान् अवतार धारण करून मुख्यतः प्रेमाचेच संरक्षण-वर्धन करतात व आनुषंगिक रीतीने (गौणत्वाने) धर्माचे सेवन-पालन करतात, असें माझें मत आहे.

८९. शुद्धनिष्काम भक्तीचे फळ श्रीहरीचे दर्शन नसून प्रेमानें चित्त हरिमय होणें हे आहे, असें माझें मत आहे.

९०. गोपी, कृष्ण, उमा व शिव यांचे व जगद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचे शाहाण्या पुरुषांनी नित्य पूजन करावें, असें माझें मत आहे.

श्रीमद्भागवतग्रन्थस्य ज्ञानेश्वर्या विशेषतः ।
सर्वदा पठनं कुर्यादिति स्वमतनिर्णयः ॥९१॥
धर्मेऽन्तर्भावयेन्नीतिं नीत्यां धर्मं विपद् यदि ।
वेदान्तं संश्रयेन्नित्यमिति स्वमतनिर्णयः ॥९२॥
तत्पदार्थोऽप्यपरोक्षो ज्ञातव्यः शक्तिवृत्तितः ।
लक्षणावृत्तितो ब्रह्म ज्ञेयं स्वमतनिर्णयः ॥९३॥
व्यवहारे मन्त्रसाम्यं भवेद् देशिकशिष्ययोः ।
परमार्थे गुर्वधीनः शिष्यः स्वमतनिर्णयः ॥९४॥
वस्तुतो लोकरीत्यैवोपदिशेन्नाम सद्गुरोः ।
कृष्णशंकरमन्त्रौ वेत्येवं स्वमतनिर्णयः ॥९५॥

९१. श्रीमद्भागवत ग्रंथाचे व त्यातहि विशेषतः श्रीज्ञानेश्वरीचें नेहमी पठण करावें, असें माझें मत आहे.

९२. *नेहमी नीतीचा धर्मांत अंतर्भाव करावा म्हणजे धर्मानुसार नीतीनें वागावें व *आपत्काली नीतीमध्यें धर्माचा अंतर्भाव करून *वेदान्तशास्त्राचा नित्य आश्रय करावा; असें माझें मत आहे.

९३. अपरोक्ष तत्पदार्थ शक्तिवृत्तीनें जाणावा व ब्रह्म लक्षणावृत्तीने जाणावें असें माझें मत आहे.

९४. व्यवहारामध्यें गुरु व शिष्य या दोघांनीं बरोबरीच्या मित्राप्रमाणे परस्परांस सल्लामसलत विचारावी पण परमार्थांत मात्र शिष्याने श्रीगुरूच्या सर्वस्वी अधीन असावे असें माझें मत आहे.

९५. लोकरीत्यनुसार श्रीगुरूच्या मंत्राचा उपदेश करावा किंवा शंकर, कृष्ण यांचे मंत्र द्यावे, असें माझें मत आहे.

माधुर्ये दीक्षितः कुर्यात्कात्यायन्युत्सवं परः ।
मातृकार्यधिया कुर्यादिति स्वमतनिर्णयः ॥९६॥
जन्माष्टमी, शिवरात्रिर्गोपीपूजा, गुरूत्सवः ।
चतुष्कं सर्वदा सर्वैः पाल्यं स्वमतनिर्णयः ॥९७॥
एकादशी सदोपोष्या सर्वैः पूर्वा न चापरा ।
शिवरात्रिर्निशीथस्था चेति स्वमतनिर्णयः ॥९८॥

मात्राधिक्यवती शुद्धा ऽविद्धा वैकादशी यदा ।
द्वेऽप्युपोष्ये तदा सर्वैरिति स्वमतनिर्णयः ॥९९॥
प्रबला दुर्बला भक्तिः प्रतीतिर्वा न कस्यचित् ।
परिभावस्य हेतुः स्यात्स्वदम्भ इति निर्णयः॥१००॥

९६. ज्याला माधुर्यदीक्षा मिळाली असेल अशा पुरुषांनीच स्वतः कात्यायनी व्रतोत्सव करावा. इतरांनी (दुसऱ्यांनी) मातृकार्य- मातेचे व्रत समजून, मातेचा प्रतिनिधी समजून करावे, असें माझें मत आहे.

९७. जन्माष्टमी, शिवरात्री, गोपीपूजा, गुरूचा उत्सव हे चार उत्सव सर्वदा सर्वांनी पाळावे असें माझें मत आहे.

९८. एकादशी ही नेहमी पहिलीच करावी दुसरी करूं नये आणि शिवरात्री निशीथव्यापिनी घ्यावी असें माझें मत आहे.

९९. जेव्हां एकादशीची वृद्धि असेल पण ती दशमी विद्ध नसतां शुद्ध एकादशीची जेव्हां वृद्धी राहील (म्हणजे दोन दिवस एकादशी राहील) तेव्हां सर्वांनी दोन दिवस उपोषण करावे असें माझें मत आहे.(येथे अरुणोदय वेध घेतला नसून सूर्योदय वेध घेतला आहे)

१००. कोणाचीहि भक्ती किंवा अनुभव प्रबल अथवा दुर्बल नाही आपला दंभच भक्तीला व अनुभवाला दुर्बल करतो, असे माझे मत आहे.

बलं वादिबले नान्यच्छ्रुतियुक्त्यनुभूतितः ।
प्रबलं स्वयमद्वैतमिति स्वमतनिर्णयः ॥१०१॥
जीवन्मुक्तौ स्थिता भक्तिः कैवल्ये सुखतामियात् ।
तत्राऽवाच्या प्रतीतिः स्यादिति स्वमनिर्णयः॥१०२॥
गुरौ कृष्णे यदा वा स्याद् वात्सल्यं भावेयत्तदा ।
कान्तं शिवं शिवं कान्तमिति स्वमतनिर्णयः ॥१०३॥
प्रतिबिम्बापेक्षयैव बिम्बत्वारोप ईष्यते ।
बिम्बभूतः परेशः स्यादिति स्वमतनिर्णयः ॥१०४॥
अनध्यस्तविवर्तस्तद्देहो मूर्तिस्तुरीयका ।
सृष्टौ मूर्तित्रयं हि स्यादिति स्वमतनिर्णयः ॥१०५॥

१०१. वादामध्यें श्रुति, युक्ति, अनुभव ह्या तीन प्रमाणापेक्षां

कोणतेहि दुसरे प्रमाण बलवान् नाही. कारण अद्वैत हे स्वतःच बलवान् आहे, असें माझें मत आहे.

१०२. जीवन्मुक्तीत जी भक्ति राहते तीच विदेहमुक्तीत सुखस्वरूप होते. विदेहमुक्तीतील भक्तीची प्रतीति शब्दाच्या पलीकडे आहे, असें माझें मत आहे.

१०३. ज्या स्त्रीचे श्रीकृष्णाच्या किंवा श्रीगुरूच्या ठिकाणी वात्सल्य भक्ति असेल तिने *पति असल्यास त्याचे ठिकाणी शिवाची भावना करावी व *पति नसल्यास शिवाला पति समजावे असें माझें मत आहे.

१०४. प्रतिबिम्बाच्या अपेक्षेनेच बिम्बत्वाचा आरोप होतो म्हणून प्रतिबिंबरूप जीवाच्या अपेक्षेने ब्रह्मच बिम्बरूप परमेश्वर होय, असें माझे मत आहे.

१०५. त्या बिंम्बभूत परमेश्वराचा देह अनध्यस्तविवर्त आहे (भ्रमाने कल्पिलेला नव्हे) म्हणून ब्रह्मज्ञानाने नाश पावत नाही. ती साकार मूर्ति जगताच्या उत्पत्ति, स्थिति, लय याकरिता मानलेल्या ब्रह्मा, विष्णु, महेश्वर या तीन मूर्तीहून चवथी आहे. तीच मूर्ति सृष्टिकाली रज तम सत्त्व या तीन गुणांच्या आश्रयानें ब्रह्म, शंकर, विष्णु स्वरूप भासते, असें माझें मत आहे.

अनध्यस्तविवर्तो हि शिवकृष्णमयं वपुः ।
अनन्यभक्त्या संसेव्यमिति स्वमतनिर्णयः ॥१०६॥
शिष्यसंरक्षणे कृष्णो ऽपवादे शंकरो गुरुः ।
आरोपकथने धाता चेति स्वमतनिर्णयः ॥१०७॥
गुरोर्वाचा लब्धमेतद् गुरुवाक्येन लीयते ।
अतस्त्रिमूर्तिः प्राक् ज्ञानाद्गुरुःस्वमतनिर्णयः ॥१०८॥
ज्ञानोत्तरमपि ज्ञानान्न नाशः सद्गुरोर्यतः ।
अनध्यस्तविवर्तः स इति स्वमतनिर्णयः ॥१०९॥
कदाचित्कट्यधोभागं कराभ्यां न वृथा स्पृशेत् ।
स्पृष्टे हस्तो मृज्जलाभ्यां क्षाल्यः स्वमतनिर्णयः ॥११०॥
मूत्रद्वारं श्लेष्मद्वारं गुदद्वारं क्षणे क्षणे ।

जलेन विमलीकुर्यादिति स्वमतनिर्णयः ॥१११॥
कार्यो जन्मोत्सवो नित्य रघुनाथ-नृसिंहयोः ।
तथा दत्तात्रयस्यापीत्येवं स्वमतनिर्णयः ॥११२॥

१०६. श्रीशिवकृष्णांचे देह अनध्यस्तविवर्त म्हणून पूर्ण ब्रह्मस्वरूप असल्यामुळे अनन्यभक्तीने त्यांचे सेवन करावे, असें माझें मत आहे.

१०७. प्रथम, भ्रमाने सृष्टि कशी उत्पन्न झाली, हे श्रीगुरु सांगतात म्हणून ते ब्रह्मदेवस्वरूप आहेत. विघ्न निवारण करून व आत्मप्राप्ति करून देऊन जन्ममृत्यु परंपरेपासून शिष्याचे संरक्षण करतात म्हणून श्रीगुरु श्रीकृष्णस्वरूप आहेत. आणखी, ब्रह्मज्ञान देऊन मृत्युरूप संसाराचा नाश करतात म्हणून श्रीगुरू शंकररूप आहेत असें माझें मत आहे.

१०८. सर्वांचा आद्यगुरु परमेश्वर होय, त्या गुरूच्या वचनानेच संसार प्रत्ययाला येतो आणि तोच आद्य गुरु परमेश्वर मुमुक्षूकरिता श्रीगुरुरूपाने प्रगट होऊन आपल्या आत्मज्ञान-बोधक वाक्याने सर्व प्रपंचाचा नाश करतो; म्हणून ब्रह्मज्ञानापूर्वी श्रीगुरु ब्रह्मा-विष्णु-शिवस्वरूप आहेत, असें माझें मत आहे.

१०९. आत्मज्ञानानंतरहि त्या आत्मज्ञानाने सद्गुरूंचा संसाराप्रमाणे अत्यंताभावरूप नाश होत नाही म्हणून सद्गुरु अनध्यस्तविवर्त आहेत, असें माझें मत आहे.

११०. केव्हाहि आपण कमरेच्या खालच्या कोणत्याहि भागाला विनाकरण स्पर्श करूं नये. स्पर्श झाल्यास मातीपाण्यानें हात धुवावे, असें माझें मत आहे.

१११. मूत्रद्वार, मलद्वार, श्लेष्मद्वार ही तिन्ही द्वारे क्षणोक्षणी पाण्यानें स्वच्छ करीत असावें, असें माझें मत आहे.

११२. श्रीरामजयंति, नृसिंहजयंति, आणि दत्तात्रेय जयंति ह्यांचे उत्सव करावें, असें माझें मत आहे.

॥ श्रीमदसद्गुरु श्री ज्ञानेश्वर चरणयोः समर्पितमस्तु ॥

०००

१०.कान्त-कान्ता-वाक्य-पुष्पम्

(प्रथम यष्टीतून)

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ मंगलाचरण ॥

यत्कृपालेशमात्रेण महिषो वेदपारगः।
ज्ञानेश्वरं तमाचार्यं वंदे बद्धांजलिर्मुदा ॥१॥
तपोभिः क्षीणपापानामिहामुत्रविरागिणाम् ।
सत्संवादमिषेणात्र भक्तिर्ज्ञानं च कथ्यते ॥२॥

अर्थ - ज्यांच्या किंचित कृपाप्रसादाने रेडा वेद बोलू लागला त्या सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजांना हात जोडून वंदन करतो ॥१॥ तपश्चर्येने ज्यांनी आपली पापे धुवून टाकली व ऐहिक व पारलौकिक सुखावर तिलांजली दिली असा साधकांकरिता भक्ति व ज्ञान विषयक संवाद सांगतो ॥२॥

विषयनिवृत्त्यनंतरमात्मज्ञानेनैव ब्रह्मणः सच्चिदांशद्वयम् अविद्यानिवृत्तिपूर्वकं ज्ञातुं शक्यते ।

अर्थ - वैराग्यप्राप्तीनंतर आत्मज्ञानाने अज्ञान घालविल्यावर ब्रह्माच्या सदंश व चिदंशांचे म्हणजे साक्षीस्वरूपाने ज्ञान मिळू शकते.

किंतु स्वानंदप्राप्तये भक्तिरेव गरीयसीति श्रुतिस्मृतिपुराणेतिहासानां अभिप्रायः ।

अर्थ - ब्रह्मानंद प्राप्तिकरिता श्रुति स्मृति पुराणादि इतिहासावरून असे दिसते की भक्तिच श्रेष्ठ आहे. म्हणजे भगवंताची भक्तीच केली पाहिजे.

तत्र भूबीजांकुरतरुफलरूपा निरूपाधिमायोपाधिसूत्रविराड् विष्णवश्चैते पंचेश्वरपुरुषा नीलकंठोक्ता भवन्ति ।

अर्थ -

१. **'भू'रूप** म्हणजे निरूपाधिक ब्रह्म किंवा शुद्ध ब्रह्म.
२. **'बीज'रूप** म्हणजे मायोपाधिक ब्रह्म.

३. **'अंकुर'रूप** म्हणजे हिरण्यगर्भ किंवा ब्रह्मदेव.

४. **'तरु'रूप** म्हणजे विराटस्वरूप.

५. 'फल'रूप म्हणजे विष्णु, शिव, रामकृष्णादि अवतार.

- असे ईश्वर पुरुषांचे पांच प्रकार नीलकंठाचार्यांनी सांगिले आहे.

तत्र ब्रह्मैव भगवद्भक्तानुग्रहकरणेक्षणात् विष्णुरूपेण स्वयमाविर्भवति ।

अर्थ – हे ब्रह्मच स्वेच्छेने विष्णुरूपाने भक्तावर अनुग्रह करण्यासाठी अवतार घेते.

स आविर्भावोऽपि नित्यः सुखैकानुग्रहकरणेक्षणमात्रत्वात् ।

अर्थ – भक्तावर सुखरूप अनुग्रह करण्याच्या इच्छेने अवतार होत असल्यामुळे तो नित्य म्हणजे अविनाशी आहे.

अयमेव भक्तिसदनम् ।

अर्थ – हेच भक्तीचे मंदिर होय म्हणजे अशा या अवताराचीच भक्ती होऊ शकते.

तद्वाररक्षकज्ञानप्राप्तये शांकरपदार्थानुदाहरति ।

अर्थ – ज्ञान हे भक्तीचे द्वाररक्षक आहे म्हणजे ती भक्ति ज्ञानानंतर होते असे हे ज्ञान श्रीशंकराचार्यांनी सांगितले, ते असे -

ईशो माया महान् जीवः संबंधो भेद एव च ।
अत्र पंचानादि सान्ताश्चेशोऽनादिरनन्तकः ॥३॥
ईशो हि ब्रह्मशब्देन वेदान्ते समुदाहृतः ।
मायाऽज्ञान प्रधानाद्याः पर्याया मुनिसंमताः ॥४॥
मायोपाधिर्जगद्योनिः सर्वकृच्छबलो महान् ।
हेमगर्भोऽपरेशश्च पर्यायौ शबलांशकौ ॥५॥

अर्थ – (१) ईश्वर, (२) माया, (३) मायोपाधिक ब्रह्म, (४) जीव, (५) चैतन्य व अविद्या यांचा संबंध, (६) जीव व ईश्वर यांचा भेद; ह्या सहा पदार्थांमध्ये ईश सोडून बाकीचे अनादि व सान्त आहेत. ईश म्हणजे शुद्ध ब्रह्म अनादि व अनंत आहे. ॥३॥ वेदान्तात 'ईश' शब्दाने ब्रह्मच सांगितले आहे व माया, अज्ञान, प्रकृति, अव्यक्त, प्रधान एकाच अर्थाचे आहेत, असे मुनींनी अंगीकारिले आहे. ॥४॥ या जगताचे कारण

मायोपाधिक शबल ब्रह्म आहे. हिरण्यगर्भ हा अपरेश म्हणजे गौण ईश्वर आहे. यालाच शबलब्रह्म किंवा मुख्य जीव म्हणतात. ॥५॥

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं जगदिति श्रुतिः ॥६॥
मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां तस्मादिति परा श्रुतिः ॥७॥

माया म्हणजे प्रकृति व मायेला धारण करणारा तो महेश्वर जाणावा. ह्या प्रकृतिनेच सर्व जग व्यापिले असे श्रुति म्हणते. ॥६॥ सर्व भूतांचे उत्पत्तिस्थान म्हणजे परमात्म्याची त्रिगुणात्मक प्रकृति, त्या महद्ब्रह्मरूप प्रकृतीच्या ठिकाणी परमेश्वर सामर्थ्यरूप बीज स्थापन करतो म्हणजे परमेश्वराचे सत्तेने ही प्रकृति कार्य करू लागते असे गीतेत म्हटले आहे. ॥७॥

अस्येशादिपदार्थत्रयस्य लक्षणानि भक्तिपदतीर्थामृतात् बुधैरुपहर्तव्यानि ।

अर्थ – ईश, माया, महान् म्हणजे मायोपाधिक ब्रह्म ह्या तीन पदार्थांची लक्षणे भक्तिपदतीर्थामृत या ग्रंथात मी विस्तृत केली आहेत, ती शहाण्यांनी जाणून घ्यावी.

पदार्थषट्कलक्षणानि अपेक्षितानि चेत् शारीरकशांकरभाष्यप्रोक्तानि अत्र विस्तरभयान्नास्माभिर्लिख्यन्ते ।

अर्थ – शारीरक शांकरभाष्यात सहा पदार्थांची लक्षणे केली आहेत. विस्तारभयास्तव ती आम्ही येथे सांगत नाही. अपेक्षा असल्यास ती मूळग्रंथावरून पाहून घ्यावीत.

''परापरेति भेदेन द्वे विद्ये'' मुंडकोक्तितः ।

अर्थ – विद्येचे परा व अपरा असे दोन प्रकार मांडुक्योपनिषदात सांगितले आहेत.

तत्रोपनिषत्पुराणेतिहासवर्जितवेदवेदांगप्रतिपाद्याऽपरा ।

अर्थ – वेदातील उपनिषत् भाग व पुराणेतिहासादिकातील ज्ञानभाग सोडून वेदवेदांगादिकांतून वर्णन केलेला भाग ही**अपराविद्या** होय.

उपनिषत्पुराणेतिहासप्रतिपाद्या परेति ''वेदार्थादधिकं मन्ये पुराणानि

वरानने'' इति नारदोक्तितः स्पष्टमेव प्रतीयते ॥

अर्थ – उपनिषत् पुराणेतिहासात सांगितलेली विद्या **पराविद्या** होय, हे ''वेद अस्पष्टार्थबोधक असून पुराण स्पष्टार्थबोधक आहेत'' या श्रीनारदाचार्यांच्या वचनावरून स्पष्ट आहे.

शिष्य उवाच -

यदेकं निष्कलं ब्रह्म व्योमातीतं निरंतरम् ।
यस्मिन्नतद्व्यावृत्या चकितं वदति श्रुतिः ॥८॥
तस्मिन् शुद्धे चिदाकाशे लक्ष्यज्ञानैकगोचरे ।
अनादि जडरूपाया मायायाः किमुत प्रमा ॥९॥
ब्रह्मरूपात् पृथक् सास्ति ह्यपृथग्वाऽथ विद्यते ।
कस्य स्याद् बंधनं तस्याः कस्य नेति वेदस्व भोः ॥१०॥

अर्थ – शिष्य म्हणतो : ब्रह्म जर अंशरहित, आकशाच्या पलीकडे असणारे व अविनाशी आहे तर ब्रह्माहून जे निराळे भासते त्याची निवृत्ति करून वेद भीत भीत ब्रह्माचे ''नेति नेति'' असे वर्णन कां करतात ॥८॥ अशा या शुद्ध ज्ञानप्रकाशात व जे ब्रह्मज्ञानाने प्राप्त होते. त्यात जडरूप असणाऱ्या मायेची उत्पत्ति कशी झाली ॥९॥ *(ती माया ब्रह्माहून वेगळी आहे का की एकरूप आहे तिचापासून बंधन कोणाला होते आणि कोणाला होत नाही हे स्वामी आपण सांगा ॥१०॥* ***टीप*** *– हा अर्थ मुळात श्रीबाबाजीमहाराजांचा अनुवाद नसल्यामुळे वेगळा केला आहे.- संपादक.)*

श्रीगुरुरुवाच -

श्रृणु वत्स गुरुशास्त्रयोः साधनदशायां सिद्धदशायां च यत्प्रयोजनं तत्ते सादिभ्रमानादिभ्रमनिवृत्तिमिषेण फलरूपतयोपदिश्यते ।

अर्थ – श्रीगुरु म्हणतात : हे वत्सा ! साधनदशेत साधकाला व सिद्धदशेत ज्ञान्याला गुरु व शास्त्राचा काय उपयोग आहे, ते ऐक -

सादिभ्रम म्हणजे भ्रमाचा आरंभ व अनादिभ्रम म्हणजे भ्रमाला आरंभच नाही, अशा या दोन्ही भ्रमाची निवृत्ति करण्याच्या निमित्ताने उपदेश करतो.

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।

विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥११॥
ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत् परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥१२॥
ब्रह्मैवानादिरूपं हि मायाऽनादिस्वरूपिणी ।
तस्मान्माया ब्रह्मरूपात्पृथक् क्वापि न विद्यते ॥१३॥
सादिभ्रमोपदेशे तु मुक्तानां बंधसंभवः ।
तस्मादनादिरूपेण माया तिष्ठतु सर्वदा ॥१४॥
सादिभ्रमस्य निवृत्तेः साधनं नैव विद्यते ।
तस्मादेषा ह्यनादिः स्यान्मायाऽविद्या च मे मतिः ॥१५॥

अर्थ – गीतेत म्हटले आहे की, प्रकृति व पुरुष हे अनादि आहेत म्हणजे त्यांचा आरंभच नाही. सत्त्व, रज, तम हे गुण व त्यांचे विकार हे प्रकृतीचे कार्य आहेत. ॥११॥ ज्याला ज्ञेय म्हणतात ते मी सांगतो - जे जाणले असतां जीव अविनाशी होतो ते उत्पत्तिरहित असलेले परब्रह्म होय. त्याला सत् म्हणता येत नाही व असत्हि म्हणता येत नाही. ॥१२॥ ब्रह्म अनादि आहे व माया हीहि अनादि आहे, म्हणून माया ब्रह्मस्वरूपाहून वेगळी कोठेहि राहत नाही ॥१३॥ भ्रम म्हणजे माया. हिचा आरंभ मानला तर मुक्तांना बंध होतो असे मानावे लागेल. हा दोषपरिहार करण्याकरिता माया अनादि आहे म्हणजे मायेला आरंभ नाही, असे म्हटले आहे. ॥१४॥ जर मायेचा आरंभ काल असला तरी तिच्या निवृत्तीचे कोणतेच साधन नाही. म्हणून माया/अविद्या अनादि आहे असे माझे मत आहे ॥१५॥

ब्रह्मात्मैक्यप्रत्ययेऽपि विस्मृतेः प्रत्ययो वृथा ।
सोऽयं सादिभ्रमस्तस्य निवृत्तिश्चास्ति नास्ति वा ॥१६॥
गुरुवाक्येन निवृत्तिं यः पश्यति स पश्यति ।
न पश्चन्ति ज्ञानमूढा ब्रह्मालस्याभिमानिनः ॥१७॥
यस्य ब्रह्माभिमानोऽस्ति देहेऽपि ममता तथा ।
न स योगी न वा भोगी केवलं दुःखभागसौ ॥१८॥
अनादिभ्रमनिवृत्तिर्न शास्त्राध्ययनं विना ।

सादिभ्रमस्य निवृत्तिर्न गुरोर्वचनं विना ॥१९॥
यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥२०॥

अर्थ – जीव ब्रह्मैक्य झाल्यावरहि आत्मविस्मृतीचा प्रत्यय व्यर्थच राहतो. त्याला सादिभ्रम म्हणावे. या भ्रमाची निवृत्ति होते किंवा नाही. (होते) ॥१६॥ गुरुवाक्याने भ्रमनिवृत्ति ज्याची झाली त्याचीच खरी भ्रमनिवृत्ति झाली. ब्रह्मज्ञान झाले असे समजून आळशी होऊन राहणारे पढतमूर्ख यांच्या भ्रमाची निवृत्ति होत नाही. ॥१७॥ ज्याला 'ब्रह्मज्ञान झाले' असा अभिमान असतो व ज्याची देहावर ममता किंवा प्रेम असते तो ज्ञानी नव्हे किंवा भोगी नव्हे. तो केवळ दु:ख भोगणाराच होय ॥१८॥ अनादिभ्रमाचा निरास शास्त्राध्ययनाने होतो व सादिभ्रमाचा निरास गुरुवाक्याने होतो. ॥१९॥ ज्याची देवाचे व श्रीगुरूचे ठिकाणी सारखी पराभक्ति असते त्या पुरुषाला श्रुतीचा यथार्थ बोध होतो ॥२०॥

चक्रवाकखगस्यात्र मृगतोयं करोति किम् ।
तथा माधवभक्तस्य ह्यविद्या किं करिष्यति ॥२१॥
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥२२॥
मृगांबुजन्मनिवृत्तिं चक्रवाको न चेच्छति ।
तथा माधवभक्तोऽपि मायासत्वमुपेक्षते ॥२३॥
चक्रवाकैरदृष्टाऽपि मृगैर्दृष्टा मरीचिका ।
अज्ञानिभिः संप्रदृष्टा भक्तो ऽविद्यां न पश्यति ॥२४॥
एतत्ते कथितं गुह्यं ज्ञानेश्वरकृपालवात् ।
यो जानाति यथा वत्स सुखमत्यन्तमश्नुते ॥२५॥
कान्तकान्तावाक्यपुष्पग्रथनं गद्यपद्ययोः ।
यः सेवते प्रभातेऽस्मिन् व्रजेद्धि परमां गतिम् ॥२६॥

अर्थ – ज्याप्रमाणे चक्रवाक् पक्ष्याला मृगजलाची बाधा होत नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताला अविद्येची बाधा होत नाही. (ह्या वचनाचे समर्थन गीतेतील श्लोकाने होते) ॥२१॥ त्याचा अर्थ असा :- ''माझी ही त्रिगुणात्मक

माया पार करणे दुस्तर आहे. पण जे मला शरण येतात तेच ही दुस्तर माया पार करून जातात'' ॥२२॥ मृगजलाबाहेर कसे होता येईल याची चिंता चक्रवाकपक्षी करीत नाही त्याप्रमाणे श्रीकृष्णभक्त मायेच्या भासाकडे दुर्लक्ष करतो ॥२३॥ ज्याप्रमाणे मृगाला मृगजल दिसते परंतु चक्रवाक पक्ष्याला ते दिसत नाही, त्याप्रमाणे अज्ञानी लोकांना अविद्या / माया दिसते. परंतु भगवद्भक्ताला अविद्या दिसत नाही ॥२४॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने हे गुह्य तुला कथन केले. जो कोणी हे चांगले समजून घेईल तो हे वत्सा ! अत्यंत सुखी होईल ॥२५॥ जो दररोज सकाळी ह्या पतिपत्नीसंवादाचे मनन करील त्याला सद्गति प्राप्त होईल ॥२६॥

॥ इति कांतकातावाक्यपुष्पं समाप्तम् ॥

०००